# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०२/०७/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील सोनेझरी बाबासावजी भोजनालय मागे उमरेड येथे दिनांक २७/०६/२०२२ चे २१/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ किरण वैभव बगडे, वय २८ वर्ष, रा. चारगाव (बुजुरूक)ता वरोरा जि चंद्रपुर व आरोपी क्र. ०१. वैभव प्रकाश बगडे, वय ३४ वर्ष, रा. चारगाव (बुजुरूक)ता. वरोरा जि. चंद्रपुर हे दोघेही पती–पत्नी असुन आरोपी क्र. १. च्या रूमवर आरोपी क्रमांक ०२. वय २६ वर्षीय बाई हिच्या सोबत राहत असल्याचे माहित होताच फिर्यादीने आरोपी क्रमाकं १. यास आरोपी क्र. २. हिला रूमवर ठेवण्याचे कारण विचारले असता यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीला शिवीगाळ करून हातबुक्यांनी मारहाण केली. त्यादरम्यान फिर्यादीस जिवाणे मारण्याचा उद्येशाने फिनाईल पाजुन ती ओमेटींग करून फिनाईल फेकु नये म्हणुन गळा दाबुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०७, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. २ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री दिनेश खोटेले मो नं ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा मकरधोकडा शेतशिवार येथे ३०/६/२२ चे १९.०० वा. ते दि. ०१/०७/२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– नुतन यादवराव गजभिये, वय ४२ वर्ष रा, मकरधोकडा ता उमरेड यांच्याकडे हिदुस्तान पेट्रोलियम लिमीटेड कॉर्पोरेशन चे मकरधोकडा एच पी गॅस सिलेंडर चे डिलरशिप असून ते स्वता चालवितात. त्यांचा डिलर कोड १९२३२०७० हा असून तिथे अमोल मेश्राम रा. मकरधोकडा हा ऑफीस मधील काम पाहतो व मकरधोकडा गावातील ग्राहकांना सिलेंडरचा पुरवठा करतो. फिर्यादीचे स्वताचे मालकीचे मकरधोकडा शिवारात गोडावून असून त्यामध्ये दिवसा काम करणारे कामगार राहतात, फिर्यादी हा दि. ३०/०६/२०२२ रोजी रात्री ०७.०० वा. सुमारास गोडावून व कार्यालय बंद करून कुलुप लावून घरी गेले व सकाळी दि. ०१/०७/२०२२ रोजी गोडावून कडे फिरण्यास गेले असता गोडावूनचे चॅनल गेट उघडे दिसले. त्यांनी आत जावून पाहणी केली गोडावून मधून गॅस भरलेले ४० व रिकामे ३४४ सिलेंडर मधून १) ३९ गॅस भरलेले प्रत्येकी किंमत ३१९० रूपये प्रमाणे एकुण १२४४१०/–रूपये, २) ११३ गॅस भरून नसलेले रिकामे सिलेंडर प्रत्येकी किंमत २२०० रूपये प्रमाणे एकुण २४८६००/–रूपये, ३) सिलेंडर नेण्याकरीता असलेली ट्राली बॉक्स १०० नग प्रति २०० रूपये एकुण किंमत २००००/–रूपये ४) गॅस शेगडी १२ नग प्रति नग १६०० रूपये प्रमाणे एकूण किंमत १९,२००/–रूपये ५) गॅस रेगुलेटर २५ नग प्रति नग १५० रूपये प्रमाणे एकुण ३,७५०/–रूपये, ६) गॅस होज पाइप ५० नग प्रति नग १९० रूपये प्रमाणे ९५००/–रूपये, ७) गोडावून ला लागून असलेल्या कार्यालयामधील डिव्हीआर मशीन १ नग किंमती १,५००/–रूपये, ८) गल्यामधील नगदी ५००/–रूपये असा एकुण ४,२७,४६०/– रूपये चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने गोडावून चा समोरील लोखंडी दाराचा व लोखंडी चॅनल गेटचा व कार्यालयाचा लोखंडी दाराचा कुलुप तोडून आत प्रवेश करून रात्री दरम्यान चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री खोब्रागडे मो.नं. ८८८८९७१८३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**